वाचले :- १) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम -१९८२ मधील नियम १०(१).

२) अधिकार प्रदान आदेश क्र.प्रशा/२/कावि/४४६/१५ दिनांक २०/१०/२०१५

३) मुख्याध्यापक,माध्यमिक विद्यालय केशवनगर यांचे दि.१०/११/२०१६ रोजीचे पत्र

४) मा.लेखाधिकारी यांचेकडील दि.२४/१०/२०१६ रोजीचे घरबांधणी अग्रीम नाहरकत प्रमाणपत्र.

५) मा.शिक्षणाधिकारी यांचेकडील दि. ५/१२/२०१६ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ १०८.
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/१/कावि/१५२१/१६
दिनांक :- ५/१२/२०१६

विषय :- <u>नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत.</u>
श्री.शिंदे प्रभाकर ताराचंद, पदनाम-सहाय्यक शिक्षक(संगणक क्र.५७८८)

आदेश,

श्री.शिंदे प्रभाकर ताराचंद हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहाय्यक शिक्षक या गट क मधील पदावर माध्यमिक विद्यालय केशवनगर येथे कामकाज करीत आहेत. दिनांक ०२/०७/१९८७ रोजी ते म.न.पा.मध्ये सहाय्यक शिक्षक पदावर रूजू झाले आहेत. त्यांच्या सेवानोंद पुस्तकामधील नोंदीनुसार त्यांची जन्मतारीख ०१/०१/१९५९ अशी असून,दिनांक दि.३१/१२/२०१६ रोजी त्यांच्या वयास ५८ वर्ष पूर्ण होत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम -१९८२ मधील नियम १०(१).नुसार गट क मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्षे पूर्ण होतील त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानानुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय केशवनगर यांनी दिनांक १०/११/२०१६ रोजीच्या पत्रान्वये श्री.शिंदे प्रभाकर ताराचंद, सहाय्यक शिक्षक यांचेकडून म.न.पा.चे घरबांधणी कर्ज, वाहन कर्ज,संगणक कर्ज येणे बाकी नसलेबाबत दाखले सादर केले आहेत. त्यानुसार त्यांचेकडे कोणत्याही प्रकारचे कर्ज बाकी नसलेचे निदर्शनास येत आहे.तसेच त्यांचे नांवे माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढीचे कर्ज बाकी नाही. तसेच त्यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालु अथवा प्रस्तावित नाही असा अहवाल मुख्याध्यापक यांनी सादर केला असून त्यांना दिनांक ३१/१२/२०१६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस शिफारस केली आहे.

शिंदे प्रभाकर ताराचंद, सहाय्यक शिक्षक हे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत येण्यापुर्वी भारती विद्यापीठाचे शंकरराव मोरे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज एरंडवणे, पुणे ४११ ०३८ येथे कार्यरत असलेने त्यांना विमुक्ती प्रमाणपत्रानुसार दि.११/०६/१९८४ पासुन सेवासातत्य देण्यात आलेले आहे. त्या संदर्भात भविष्यात लेखा परिक्षणाची वसुली निघाल्यास त्याची संपूर्ण रक्कम संबंधिताचे निवृत्ती वेतनामधून वसूल करणेत येईल.

सबब, मी शिक्षणाधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ उपरोक्त वाचले क्र.१ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन)नियमातील उक्त तरतूद विचारात घेवून उपरोक्त वाचले क्र.२ चे आदेशान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार शिंदे प्रभाकर ताराचंद सहाय्यक शिक्षक यांना दि.३१/१२/२०१६ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री.शिंदे प्रभाकर ताराचंद, सहाय्यक शिक्षक यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

Kamble
5/12/16
प्र. शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

प्रती,

श्री.शिंदे प्रभाकर ताराचंद
सहाय्यक शिक्षक माध्यमिक विद्यालय केशवनगर

प्रत :- १) लेखा विभाग

२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंद कक्ष,संगणक कक्ष (प्रशासन)
सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष,कामगार कल्याण विभाग

३) माध्यमिक विभाग टेबल क्र. २ व ४

४) माध्यमिक विद्यालय केशवनगर, २/- पुढील कार्यवाहीसाठी



Scanned with CamScanner